कामगार, ॲफिडेव्हीट किंवा इतर आवश्यक ते व्यावसायिक यांची नेमणूक करणे, त्यांचा मेहनताना, मंजूरी वगैरे ठरविणे आणि त्यांच्या समवेतच्या अटी शर्ती नक्की करणे.

उहन - २
दसत क्र. २५८ / २०११
०१ / ११८

१५] सदर मिळकतीचे विकासाचे कामी आवश्यक ते विनंती अर्ज वगैरे कलेक्टर ठाणे, प्रांत अधिकारी ठाणे, तहसिलदार उल्हासनगर व कल्याण महानगर पालिका, राज्य सरकार, भारत सरकार आणि इतर पब्लिक, सेमी पब्लिक व लिगल ऑथोरिटीज कडे सादर करून आवश्यक ती/कामे करून घेणे.

१६] सदर विकासाचे कामी आवश्यक ते चार्जेस, डिपॉझीटस् संबंधित प्राधिकारीणी, कल्याण महानगरपालिका वगैरेकडे भरणे आणि योग्य वेळी ते परत मागणे.

१७] सदरची मिळकत कल्याण महानगर पालिकेचे डी.सी. नियमांप्रमाणे शक्य झाल्यास लगतचे प्लॉट समवेत जोडून सदरचे एकत्रित प्लॉटसवर एकत्रित इमारत आराखडा कल्याण महानगर पालिका किंवा इतर संबंधित प्राधिकारिणी यांजकडे सादर करून मंजूर करून घेणे किंवा सदर मिळकतीचे विकासाचे दृष्टीने जर विभागणी करणे आवश्यक ठरल्यास जिल्हाधिकारी ठाणे वा प्रांत

अधिकारी ठाणे यांजकडून सबडीव्हीजनची ऑर्डर करवून घेऊन किंवा ले-आउट मंजूर करवून घेणे.

१८] पाणी, वीज आणि सांडपाणीचे कनेक्शन चे संदर्भात संबंधित प्राधिकारीणीकडे ज्यात कल्याण महानगर पालिका म.रा.वि.मंडळाचा समावेश आहे कडे विनंती करून त्यांचे कडून परवानगी मिळविणे आणि सदर परवानगीनंतर पुढील सर्व गोष्टी करून सदर मिळकतीचे विकासाचे कामी पाणी, वीज कनेक्शन करून घेणे, सांडपाणीची व्यवस्था करणे वगैरे आवश्यक त्या गोष्टी करणे.

१९] सदर मिळकतीचे विकासाचे संदर्भात सदर मिळकतीवर बांधल्या जाणा-या नियोजित इमारतीचे संबंधाने नविन इमारत आराखडा सादर करणे किंवा बदललेला प्लॅन कल्याण महानगर पालिका किंवा इतर संबंधित प्राधिकारिणी यांजकडे सादर करणे. सदर प्लॅन मंजूर करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कागदपत्रे दाखल करणे. सत्य प्रतिज्ञा लेख, अन्डर टेकिंग, हमीपत्र, जाहीरनामा इत्यादी इत्यादी सादर करून सदरचा प्लॅन मंजूर करवून घेणे. त्याबाबत आयओडी व तदनंतरचे कमेन्समेंट सर्टिफिकेट मिळविणे. सदरचे आयओडी व कमेन्समेंट सर्टिफिकेटची तारीख वाढवून घेणे इत्यादी गोष्टी करणे.

उहन - ३
दस्त क्र. ९५६ / २००
६३ / ११६



२०] नियोजित इमारतीच्या बांधकामासाठी आवश्यक त्या पूढील परवानग्या जसे की, वरील मजल्याच्या बाबतीतील कमेंन्समेंट सर्टिफिकेट व इतर आवश्यक त्या परवानग्या मिळविणे ज्यात सॅनिटेशन, पाण्याचे कनेक्शन, विजेचे कनेक्शन, रस्ते वगैरे बाबतीतील परवानग्यांचा समावेश आहे.

२१] मिळकतीचे विकासासाठी महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रीसीटी बोर्डाकडून लाईट कनेक्शन मिळविणे आवश्यक ठरल्यास ट्रान्सफॉर्मर मंजूर करवून घेणे. त्यास्तव संबंधित सक्षम ऑथॉरिटीकडे विनंती अर्ज करून त्याबाबतची डिपॉझीटस्, फी, चार्जेस भरून सदर कनेक्शन्स मिळविणे.

२२] सदर मिळकतीवर बांधण्या जाणाऱ्या इमारतीवर टि. डि. आर. खालील एफ.एस.आय प्राप्त झाल्यास मंजूर आराखड्यात आवश्यक ते फेरबदल करवून त्याचा वापर करून घेणे.

२३] आमचे सदर मिळकतीबाबत असलेले टॅक्सेस बिनशेती आकार भरणे व त्याबाबतची योग्य ती पावती घेणे.

२४] सदर मिळकत विकसीत करणेचे दृष्टीने जमीनीची लेव्हलींग, भरणी करणे जरूरीचे असल्यास त्या गोष्टी स्वखर्चाने करणे व यद्दू बाजूस कंपाउंड घालणे.

- ४ -

२५] आर्किटेक्ट, इार.सी.सी. कन्सलटन्टस्, इंजिनियर्स, सूपर वायझरर्स, लेबर मुकादम, कार्यालयीन कर्मचारी वर्ग, वगैरेची नेमणूक मिळकत विकसीत करणेसाठी करणे, की जे पूढे आम्हाला महानगर पालिका, महाराष्ट्र सरकार जिल्हाधिकारी ठाणे, प्रांतअधिकारी ठाणे, तहसिलदार उल्हासनगर अतिरिक्त तहसिलदार [बिनशेती], कल्याण/उल्हासनगर टाऊन प्लॅनिंग अधिकारी, सी.टी.सर्व्हे अधिकारी आणि इतर सरकारी व निमसरकारी प्राधिकरण अधिकारी लॅन्ड रेव्हेन्यू कोड, म्यूनिसिपल अॅक्ट, नागरी कमाल जमीन धारण कायदा, १९७६ आणि इतर संबंधित कायद्याखालील अधिकारी यांचेसमोर आमचे प्रतिनिधीत्व करतील. की जे जे करुन ते सर्व प्रकारची कृत्यू, कारवाया गोष्टी ज्यात अर्ज करणे, हमीपत्र देणे व इतर कागदपत्रे सादर करून विकास कार्य पार पाडू शकतील.

२६] आमचे सदर मिळकतीचे विकास करणेचे दृष्टीने अॅडव्हेकेटस/सॉलीसीटर किंवा इतर प्रोफेशनची नेमणूक करणे की, जे विकास कार्य[illegible] कायाचे दृष्टीने कोणतेही न्यायालयात जिल्हाधिकारी ठाणे, तहसिलदार कल्याण, सीटी सर्व्हे ऑफिस कल्याण महानगर पालिका, बी.एम.आर.डी.ए. तसेच इतर सरकारी व निमसरकारी स्थानिक पब्लिक संस्था ज्यात नागरी

टहन - ३
दस्त क्र. ९५६ / २०११
९८ / ११६

लकंठ चौधरी
मथुबाई
विठाबाई
शकुंतला
बेबीबाई